# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## // पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग //

## // गोषवारा // दि०२८/०३/२०२३

**प्रकरण क्रमांक (३३४)** : पाणीपट्टी दरात वाढ करणेबाबत (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १५० अन्वये)

मिरा-भाईंदर महानगरपालिकेस स्टेम प्राधिकरणाकडून ८० द.ल.लि. व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून ११५ द.ल.लि. असा एकूण १९५ द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठा आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पाणीपट्टी घरगुती जलजोडण्यांना रु.१३/- प्रति हजार लिटर व वाणिज्य जलजोडण्यांना रु.५०/- प्रति हजार लिटर या दराने एप्रिल २०१८ पासून आकारण्यात येत आहे. सदर पाणीपट्टी दरात गेल्या चार वर्षापासून कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही.

महानगरपालिकेस दररोज स्टेम प्राधिकरणाकडून व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पाणी पुरवठा होतो. या पाणी पुरवठ्याबाबत स्टेम प्राधिकरणास रु.१०,९५०/- प्रति द.ल.लि. पाणी देयक अदा करावे लागत आहे. तर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास चे दर रु.९,०००/- प्रति द.ल.लि या दराने पाणी देयके अदा करावे लागते. सदर पाणी देयक विहीत मुदतीत अदा करणे आवश्यक असते. सदर देयकापोटी प्रदान करावयाची रक्कम व इतर पाणी पुरवठा वितरणाबाबतचा खर्च तसेच रिलायन्स एनर्जी, टाटा पॉवर कंपनी व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेकडील वीज दरात मोठ्या प्रमाणात झालेली दरवाढ, साकेत व कापुरबावडी येथील पाणी पंपिंग करणे व आस्थापनावरील खर्च या सर्व बाबींचा विचार करता पाणीपट्टी दरवाढ करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेला आता सरासरी १९५ द.ल.लि. पाणी पुरवठा केला जातो. सदर पाणी पुरवठा सरासरी २४ ते ३० तासांतून केला जातो. शहरातील लोकसंख्या वाढीचा वेग जास्त आहे. त्यामुळे नविन पाणी पुरवठा योजना हाती घेणे आवश्यक आहे.

भविष्यातील सन २०५१ पर्यंतची पाण्याची मागणी पूर्ण होणेसाठी शासनाने सुर्या धरण प्रकल्पातुन मिरा-भाईंदर शहरासाठी २१८ द.ल.लि. पाण्याचे आरक्षण मंजूर केलेले आहे. सदरचे २१८ द.ल.लि. पाणी मिरा-भाईंदर शहरापर्यंत पोहचविण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मिरा-भाईंदर व वसई-विरार महानगरपालिकेसाठी ४०३ द.ल.लि. पाणी पुरवठा योजना राबवीत आहे. या योजने अतंर्गत चेणे येथील संतुलन टाकीत प्राप्त होणारे २१८ द.ल.लि. पाणी पुढे मिरा-भाईदर शहरात आणणे, शहराअंतर्गत वितरण व्यवस्था अंथरणे व उंच जलकुंभ बांधणे इत्यादी अनुषंगीक कामे ही मिरा-भाईंदर महानगपालिकेमार्फत करावयाची आहेत. सदर योजना पूर्ण झाल्यानंतर मिरा-भाईंदर शहराचा पाणी टंचाईचा प्रश्न कायमस्वरुपी सुटणार आहे.

सदर कामाचा रु.५१६.७७ कोटी किंमतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानातंर्गत प्रशासकिय मंजूरीसाठी व निधी उपलब्धतेसाठी सादर करण्यात आला आहे. सदर प्रकल्पास शासन निर्णय अमृत-२०२२/प्र. क्र.२६८/नवि-३३ मुंबई दि.०२/११/२०२२ रोजी मान्यता प्राप्त आहे. सदर प्रकल्पाकरीता एकूण प्रकल्प किंमतीच्या ३०% निधी रु.१५५ कोटी महानगरपालिकेला उभारावा लागणार असल्याने या भांडवली खर्चाची व्यवस्था करावी लागणार आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढ झाल्यास कर्ज घेण्याची क्षमता देखील वाढेल व त्यानुसार आवश्यक कर्ज निधी प्राप्त होउ शकेल. सदर बाब विचारात घेता दरवाढ करणे क्रमप्राप्त आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका सध्या आकारत असलेले पाण्याचे दर खुपच कमी आहेत. मिरा-भाईंदर शहरातील नागरीकांना महानगरपालिका घरगुती जलजोडण्यांना रु.१.३० पैसे प्रति लिटर व वाणिज्य जलजोडण्यांना रु.५.०० पैसे प्रति लिटर या दराने पाणीपट्टी आकारत आहे. मिरा भाईंदर शहराची भविष्यातील पाण्याची गरज कायम स्वरुपी भागविण्याकरीता तसेच नविन पाणी पुरवठा योजना राबविणेकरीता प्रस्तावित केलेले पाण्याचे दर वाजवी आहेत. पाणी पुरवठा वितरण

व्यवस्थेवरील व इतर खर्च लक्षात घेता पाणीपट्टी दरवाढ करणे आवश्यक आहे. तसेच पाणी पुरवठा खर्च व जमा बाजू याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्रं. | सन | महसुली जमा (लाखात) | महसुली खर्च (लाखात) | भांडवली खर्च (लाखात) | एकूण खर्च (लाखात) | एकूण तुट (लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | | | | | (4+5) | (3-6) |
| 1. | 2019-20 | 8423.18 | 8538.41 | 1762.50 | 10300.91 | (-) 1877.73 |
| 2. | 2020-21 | 8713.49 | 8900.42 | 1042.93 | 9943.35 | (-) 1229.86 |
| 3. | 2021-22 | 9616.50 | 8861.05 | 2075.26 | 10936.31 | (-) 1319.81 |

वरील तक्त्यामधील अ.क्र.७ मध्ये दर्शविल्यानुसार प्रतिवर्षी महसूली तुट येत असल्याने पाणीपट्टी दरवाढ केल्यास महसूली तुट कमी करणे शक्य होईल.

पाणी पुरवठा विभागाची सन २०२१-२२ वर्षाची मागणी रु.७७.३९ कोटी इतकी आहे. पाणीपट्टी दरवाढ केल्यास रु.१८.३२ कोटींची वाढ होऊन अपेक्षित उत्पन्न रु.९५.७० कोटी इतके होईल.

अ) पाणीपट्टी दरातील वाढ

| जलजोडणीचा प्रकार | सध्याचे दर (रू.) प्रति हजार लिटर | प्रस्तावित केलेले दर (रू.) प्रति हजार लिटर | शेरा |
|---|---|---|---|
| घरगुती | १३.०० | १६.०० | सध्याच्या दराच्या निवासी वापराकरीता २३% व अनिवासी वापराकरीता ३०% वाढ करुन नविन दर प्रस्तावित केले आहेत. |
| वाणिज्य | ५०.०० | ६५.०० | |

दि.२७/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सह.आयुक्त नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी सदर उत्पन्न स्तोत्रा मध्ये वाढ करणे आवश्यक आहे. १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार मालमत्ता कराच्या उत्पन्नात वाढ करणे बाबत सुचवण्यात आले आहे. पंधरावा वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी विविध अटी व शर्ती निर्धारित केल्या आहेत. यामध्ये उत्पनात वाढ करणे ही प्रमुख शिफारस आणि अट निर्धारीत करण्यात आली आहे.

मा. विशेष महासभा दि.२०/०२/२०१८ ठराव क्र.५८ अन्वये पाणीपट्टी दर घरगुती रू.१३/- व वाणिज्य रू.५०/- प्रति हजार लिटर दरवाढीस मान्यता दिलेली होती. परंतु सद्यस्थितीत वाढीव खर्च व सुर्या प्रकल्पाअंर्गत होणार खर्च लक्षात घेता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १५० मधील तरतूदीनुसार पाणीपट्टी घरगुती रू.१६/- प्रति हजार लिटर (रु.१.६० पैसे प्रति लिटर) व वाणिज्य रू.६५/- प्रति हजार लिटर (रु.६.५० पैसे प्रति लिटर) याप्रमाणे मे २०२३ पासून पाणीपट्टी दरवाढ करणेस तसेच प्रतिवर्षी पाणीपट्टी दरात ५% वाढ करण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळणेस शिफारस आहे.

अंदाजे - ९८/- कोटि वाढ अपेक्षित

(शरद नानेगांवकर)
कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग //

प्रशासकीय ठराव दिनांक २८/03 /२०२३ रोजी स. ११.०० वाजता

विषय क्र. (३३४) :- पाणीपट्टी दरात वाढ करणेबाबत (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १५० अन्वये)

**<u>कार्यलयीन प्रस्तावना</u>**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेस स्टेम प्राधिकरणाकडून ८० द.ल.लि. व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून ११५ द.ल.लि. असा एकूण १९५ द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठा आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पाणीपट्टी घरगुती जलजोडण्यांना रू.१३/- प्रति हजार लिटर व वाणिज्य जलजोडण्यांना रू.५०/- प्रति हजार लिटर या दराने एप्रिल २०१८ पासून आकारण्यात येत आहे. सदर पाणीपट्टी दरात गेल्या चार वर्षापासून कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही.

महानगरपालिकेस दररोज स्टेम प्राधिकरणाकडून व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पाणी पुरवठा होतो. या पाणी पुरवठ्याबाबत स्टेम प्राधिकरणास रू.१०,९५०/- प्रति द.ल.लि. पाणी देयक अदा करावे लागत आहे. तर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास चे दर रु.९,०००/- प्रति द.ल.लि या दराने पाणी देयके अदा करावे लागते. सदर पाणी देयक विहीत मुदतीत अदा करणे आवश्यक असते. सदर देयकापोटी प्रदान करावयाची रक्कम व इतर पाणी पुरवठा वितरणाबाबतचा खर्च तसेच रिलायन्स एनर्जी, टाटा पॉवर कंपनी व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेकडील वीज दरात मोठ्या प्रमाणात झालेली दरवाढ, साकेत व कापुरबावडी येथील पाणी पंपिंग करणे व आस्थापनावरील खर्च या सर्व बाबींचा विचार करता पाणीपट्टी दरवाढ करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेला आता सरासरी १९५ द.ल.लि. पाणी पुरवठा केला जातो. सदर पाणी पुरवठा सरासरी २४ ते ३० तासांतून केला जातो. शहरातील लोकसंख्या वाढीचा वेग जास्त आहे. त्यामुळे नविन पाणी पुरवठा योजना हाती घेणे आवश्यक आहे.

भविष्यातील सन २०५१ पर्यंतची पाण्याची मागणी पूर्ण होणेसाठी शासनाने सुर्या धरण प्रकल्पातुन मिरा-भाईंदर शहरासाठी २१८ द.ल.लि. पाण्याचे आरक्षण मंजूर केलेले आहे. सदरचे २१८ द.ल.लि. पाणी मिरा-भाईंदर शहरापर्यंत पोहचविण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मिरा-भाईंदर व वसई-विरार महानगरपालिकेसाठी ४०३ द.ल.लि. पाणी पुरवठा योजना राबवीत आहे. या योजने अतंर्गत चेणे येथील संतुलन टाकीत प्राप्त होणारे २१८ द.ल.लि. पाणी पुढे मिरा-भाईदर शहरात आणणे, शहराअंतर्गत वितरण व्यवस्था अंथरणे व उंच जलकुंभ बांधणे इत्यादी अनुषंगीक कामे ही मिरा-भाईंदर महानगपालिकेमार्फत करावयाची आहेत. सदर योजना पूर्ण झाल्यानंतर मिरा-भाईंदर शहराचा पाणी टंचाईचा प्रश्न कायमस्वरुपी सुटणार आहे.

सदर कामाचा रु.५१६.७७ कोटी किंमतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानातंर्गत प्रशासकिय मंजूरीसाठी व निधी उपलब्धतेसाठी सादर करण्यात आला आहे. सदर प्रकल्पास शासन निर्णय अमृत-२०२२/प्र. क्र.२६८/नवि-३३ मुंबई दि.०२/११/२०२२ रोजी मान्यता प्राप्त आहे. सदर प्रकल्पाकरीता

एकूण प्रकल्प किंमतीच्या ३०% निधी रु.१५५ कोटी महानगरपालिकेला उभारावा लागणार असल्याने या भांडवली खर्चाची व्यवस्था करावी लागणार आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढ झाल्यास कर्ज घेण्याची क्षमता देखील वाढेल व त्यानुसार आवश्यक कर्ज निधी प्राप्त होउ शकेल. सदर बाब विचारात घेता दरवाढ करणे क्रमप्राप्त आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका सध्या आकारत असलेले पाण्याचे दर खुपच कमी आहेत. मिरा-भाईंदर शहरातील नागरीकांना महानगरपालिका घरगुती जलजोडण्यांना रु.१.३० पैसे प्रति लिटर व वाणिज्य जलजोडण्यांना रु.५.०० पैसे प्रति लिटर या दराने पाणीपट्टी आकारत आहे. मिरा भाईंदर शहराची भविष्यातील पाण्याची गरज कायम स्वरुपी भागविण्याकरीता तसेच नविन पाणी पुरवठा योजना राबविणेकरीता प्रस्तावित केलेले पाण्याचे दर वाजवी आहेत. पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेवरील व इतर खर्च लक्षात घेता पाणीपट्टी दरवाढ करणे आवश्यक आहे. तसेच पाणी पुरवठा खर्च व जमा बाजू याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्रं. | सन | महसुली जमा (लाखात) | महसुली खर्च (लाखात) | भांडवली खर्च (लाखात) | एकूण खर्च (लाखात) | एकूण तुट (लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | | | | | (4+5) | (3-6) |
| 1. | 2019-20 | 8423.18 | 8538.41 | 1762.50 | 10300.91 | (-) 1877.73 |
| 2. | 2020-21 | 8713.49 | 8900.42 | 1042.93 | 9943.35 | (-) 1229.86 |
| 3. | 2021-22 | 9616.50 | 8861.05 | 2075.26 | 10936.31 | (-) 1319.81 |

वरील तक्त्यामधील अ.क्र.७ मध्ये दर्शविल्यानुसार प्रतिवर्षी महसूली तुट येत असल्याने पाणीपट्टी दरवाढ केल्यास महसूली तुट कमी करणे शक्य होईल.

पाणी पुरवठा विभागाची सन २०२१-२२ वर्षाची मागणी रु.७७.३९ कोटी इतकी आहे. पाणीपट्टी दरवाढ केल्यास रु.१८.३२ कोटींची वाढ होऊन अपेक्षित उत्पन्न रु.९५.७० कोटी इतके होईल.

**अ) पाणीपट्टी दरातील वाढ**

| जलजोडणीचा प्रकार | सध्याचे दर (रू.) प्रति हजार लिटर | प्रस्तावित केलेले दर (रू.) प्रति हजार लिटर | शेरा |
|---|---|---|---|
| घरगुती | १३.०० | १६.०० | सध्याच्या दराच्या निवासी वापराकरीता २३% व अनिवासी वापराकरीता ३०% वाढ करुन नविन दर प्रस्तावित केले आहेत. |
| वाणिज्य | ५०.०० | ६५.०० | |

दि.२७/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सह.आयुक्त नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी सदर उत्पन्न स्तोत्रा मध्ये वाढ करणे आवश्यक आहे. १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार मालमत्ता कराच्या उत्पन्नात वाढ करणे बाबत सुचवण्यात आले आहे. पंधरावा वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी विविध अटी व शर्ती निर्धारित केल्या आहेत. यामध्ये उत्पनात वाढ करणे ही प्रमुख शिफारस आणि अट निर्धारीत करण्यात आली आहे.

मा. विशेष महासभा दि.२०/०२/२०१८ ठराव क्र.५८ अन्वये पाणीपट्टी दर घरगुती रू.१३/- व वाणिज्य रू.५०/- प्रति हजार लिटर दरवाढीस मान्यता दिलेली होती. परंतु सद्यस्थितीत वाढीव खर्च व सुर्या प्रकल्पाअंर्गत होणार खर्च लक्षात घेता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १५० मधील तरतूदीनुसार पाणीपट्टी घरगुती रू.१६/- प्रति हजार लिटर (रु.१.६० पैसे प्रति लिटर) व वाणिज्य रू.६५/- प्रति हजार लिटर (रु.६.५० पैसे प्रति लिटर) याप्रमाणे मे २०२३ पासून पाणीपट्टी दरवाढ करणेस तसेच प्रतिवर्षी पाणीपट्टी दरात ५% वाढ करणे आवश्यक आहे.

सदर पाणीपट्टी दरवाढीस प्रशासकिय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

## प्रशासकीय ठराव क्र. ३३३ दि. २८/ ०३ /२०२३

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषतः कलम ४५२ (अ) च्या (१अ) व (१ब) नुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ २०२०/प्र.क्र.७१(भाग-२) नवि-१४ दि. २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी श्री. दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन सद्यस्थितीत वाढीव खर्च व सुर्या प्रकल्पाअंर्गत होणार खर्च लक्षात घेता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १५० मधील तरतूदीनुसार पाणीपट्टी घरगुती रू.१६/- प्रति हजार लिटर (रु.१.६० पैसे प्रति लिटर) व वाणिज्य रू.६५/- प्रति हजार लिटर (रु.६.५० पैसे प्रति लिटर) याप्रमाणे मे २०२३ पासून पाणीपट्टी दरवाढ करणेस तसेच प्रतिवर्षी पाणीपट्टी दरात ५% वाढ करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

वरील पाणीपट्टी दरवाढीस पारित ठरावानुसार पाणी पुरवठा व मलनिःसारण विभागाने नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

( दिलीप ढोले )
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत :-** पाणी पुरवठा व मलनिःसारण विभाग

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**// पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग //**

**// गोषवारा //**

दि.२८/०३/२०२३

**प्रकरण क्रमांक ( 335 )** :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२९ (१) (अअ) नुसार "पाणी पुरवठा लाभ कर" लागू करणेस मंजूरी मिळणेबाबत.
(पाणी पुरवठा विभाग)

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्राचा विकास झपाटयाने होत आहे. त्यामुळे पाणी पुरवठयासारख्या अत्यावश्यक सेवेवरती ताण येत आहे. वाढत्या विकासामुळे पाणी पुरवठा अपुरा पडत आहे. सदर विकसीत होणाऱ्या भागास पाणी पुरवठा सोई व सुविधा देणेकरीता महानगरपालिकेकडून प्रकल्प हाती घ्यावे लागतात व सदरचे प्रकल्प हाती घेणकरीता महानगरपालिकेस कर्ज स्वरुपात निधी जमा करणे गरजेचे असते व सदर प्रकल्पाकरीता घेण्यात येणाऱ्या कर्ज स्वरुपातील निधिची परतफेड वेळोवेळी होणे आवश्यक आहे.

भविष्यातील सन २०४६ पर्यंतची पाण्याची मागणी पूर्ण होणेसाठी शासनाने सुर्या धरण प्रकल्पातुन मिरा-भाईंदर शहरासाठी २१८ द.ल.लि. पाण्याचे आरक्षण मंजूर केलेले आहे. सदरचे २१८ द.ल.लि. पाणी मिरा-भाईंदर शहरापर्यंत पोहचविण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मिरा-भाईंदर व वसई-विरार महानगरपालिकेसाठी ४०३ द.ल.लि. पाणी पुरवठा योजना राबवीत आहे. या योजने अतंर्गत चेणे येथील संतुलन टाकीत प्राप्त होणारे २१८ द.ल.लि. पाणी पुढे मिरा-भाईदर शहरात आणणे, शहराअंतर्गत वितरण व्यवस्था अंथरणे व उंच जलकुंभ बांधणे इत्यादी अनुषंगीक कामे ही मिरा-भाईंदर महानगपालिकेमार्फत करावयाची आहेत.

सदर कामाचा रु.५१६.७७ कोटी किंमतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानातंर्गत प्रशासकिय मंजूरीसाठी व निधी उपलब्धतेसाठी सादर करण्यात आला आहे. सदर प्रकल्पास शासन निर्णय अमृत-२०२२/प्र. क्र.२६८/नवि-३३ मुंबई दि.०२/११/२०२२ रोजी मान्यता प्राप्त आहे. सदर प्रकल्पाकरीता एकूण प्रकल्प किंमतीच्या ३०% निधी रु.१५५ कोटी महानगरपालिकेला उभारावा लागणार असल्याने या भांडवली खर्चाची व्यवस्था करावी लागणार आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढ झाल्यास कर्ज घेण्याची क्षमता देखील वाढेल व त्यानुसार आवश्यक कर्ज निधी प्राप्त होउ शकेल. सदर बाब विचारात घेता "पाणी पुरवठा लाभ कर" लावणे आवश्यक आहे.

पाणी पुरवठा विभागाचे सन २०२१-२२ वर्षाची महसुली जमा रु.८७१६ लक्ष इतकी आहे व महसुली खर्च रु.१०६४० लक्ष असून तफावत रु. १९२४ लक्ष इतकी आहे.

पाणी पुरवठयाच्या सुविधा पुरविण्यासाठी आणि त्यात सुधारणा करण्यासाठी भांडवली कामांवर केलेल्या किंवा करावयाचा संपुर्ण खर्च किंवा त्याचा काही भाग भागविण्यासाठी महानगरपालिकेला आवश्यक वाटेल एवढया त्या कामांच्या कर योग्य मुल्यांच्या टक्केवारीने आकारावयाची "पाणी पुरवठा लाभ कर" या नावाने ओळखली जाणारी अतिरीक्त पाणीपट्टी

महाराष्ट्र प्रांतिक अधिनियमचे कलम १२९ (१) (अअ) नुसार आकरणे शक्य आहे व हा कर लागू करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे. तरी उक्त तरतुदीनुसार ८ टक्के पाणीपुरवठा कर लागु केल्यास या कराच्या रुपाने महानगरपालिकेस वाढीव उत्पन्न मिळू शकेल. या करिता यापुर्वी मा.स्थायी समिती ठराव क्र. ११८ दि.११/०३/२०१० व मा.महासभा दि.३१/०३/२०१० ठराव क्र. ६८ अन्वये पाणी पुरवठा लाभ कर लागु करण्यात आलेला होता. सदर ठराव नगरविकास विभाग यांनी शासन निर्णय क्र.मिभाम-१११०/५३८/प्र.क्र. ९३/२०१०/नवि-२८ दि.१८/०१/२०११ अन्वये विखंडीत करण्यात आला आहे.

दि.२७/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सह.आयुक्त नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी सदर उत्पन्न स्तोत्रा मध्ये वाढ करणे आवश्यक आहे. १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार मालमत्ता कराच्या उत्पन्नात वाढ करणे बाबत सुचवण्यात आले आहे. पंधरावा वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी विविध अटी व शर्ती निर्धारित केल्या आहेत. यामध्ये उत्पनात वाढ करणे ही प्रमुख शिफारस आणि अट निर्धारीत करण्यात आली आहे.

राज्यातील इतर महानगरपालिका जसे ठाणे महानगरपालिकेत करयोग्य मुल्याच्या निवासी वापराकरीता १७% व अनिवासी वापराकरीता २२% तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत निवासी व अनिवासी वापराकरीता १२.५०% "पाणी पुरवठा लाभ कर" आकारण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १२९(१)(अअ) नुसार "पाणी पुरवठा लाभ कर" लावण्याची तरतुद असुन तरतुदीनुसार "पाणी पुरवठा लाभ कर" लागू करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे. राज्यातील इतर महानगरपालिकांनी देखिल सदर कर लागु केलेला आहे. उक्त तरतुदीनुसार निवासी वापराकरीता १०% व अनिवासी वापराकरीता १५% पाणी पुरवठा लाभ कर लागु केल्यास या कराच्या रुपाने महानगरपालिकेस वाढीव उत्पन्न मिळू शकेल व येणाऱ्या उत्पन्नातुन पाणी पुरवठा योजना सारखे प्रकल्प मार्गी लावणे शक्य होईल. करीता वरीलप्रमाणे करयोग्य मुल्याच्या (Ratable Value) निवासी वापराकरीता १०% व अनिवासी वापराकरीता १५% "पाणी पुरवठा लाभ कर" लागू करण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(शरद नानेगांवकर)
कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

गोषवारा प्राप्त दि. १४/२/२०२३ ... नोंद क्र. ९२-१० वा
प्रशासकीय पत्र
रजिस्टर अ. क्र. ....२६६.... वर्ष २०२२/२३

१४/२/२०२३

नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग //

**प्रशासकीय ठराव दिनांक २८ / ०३ /२०२३ रोजी स. ११.०० वाजता**

**विषय क्र. ( ३३५ ) :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२९ (१) (अअ) नुसार "पाणी पुरवठा लाभ कर" लागू करणेस मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**कार्यलयीन प्रस्तावना**

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्राचा विकास झपाटयाने होत आहे. त्यामुळे पाणी पुरवठयासारख्या अत्यावश्यक सेवेवरती ताण येत आहे. वाढत्या विकासामुळे पाणी पुरवठा अपुरा पडत आहे. सदर विकसीत होणाऱ्या भागास पाणी पुरवठा सोई व सुविधा देणेकरीता महानगरपालिकेकडून प्रकल्प हाती घ्यावे लागतात व सदरचे प्रकल्प हाती घेणकरीता महानगरपालिकेस कर्ज स्वरुपात निधी जमा करणे गरजेचे असते व सदर प्रकल्पाकरीता घेण्यात येणाऱ्या कर्ज स्वरुपातील निधिची परतफेड वेळोवेळी होणे आवश्यक आहे.

भविष्यातील सन २०४६ पर्यंतची पाण्याची मागणी पूर्ण होणेसाठी शासनाने सुर्या धरण प्रकल्पातुन मिरा-भाईंदर शहरासाठी २१८ द.ल.लि. पाण्याचे आरक्षण मंजूर केलेले आहे. सदरचे २१८ द.ल.लि. पाणी मिरा-भाईंदर शहरापर्यंत पोहचविण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मिरा-भाईंदर व वसई-विरार महानगरपालिकेसाठी ४०३ द.ल.लि. पाणी पुरवठा योजना राबवीत आहे. या योजने अतंर्गत चेणे येथील संतुलन टाकीत प्राप्त होणारे २१८ द.ल.लि. पाणी पुढे मिरा-भाईदर शहरात आणणे, शहराअंतर्गत वितरण व्यवस्था अंथरणे व उंच जलकुंभ बांधणे इत्यादी अनुषंगीक कामे ही मिरा-भाईंदर महानगपालिकेमार्फत करावयाची आहेत.

सदर कामाचा रु.५१६.७७ कोटी किंमतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानातंर्गत प्रशासकिय मंजूरीसाठी व निधी उपलब्धतेसाठी सादर करण्यात आला आहे. सदर प्रकल्पास शासन निर्णय अमृत-२०२२/प्र. क्र.२६८/नवि-३३ मुंबई दि.०२/११/२०२२ रोजी मान्यता प्राप्त आहे. सदर प्रकल्पाकरीता एकूण प्रकल्प किंमतीच्या ३०% निधी रु.१५५ कोटी महानगरपालिकेला उभारावा लागणार असल्याने या भांडवली खर्चाची व्यवस्था करावी लागणार आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढ झाल्यास कर्ज घेण्याची क्षमता देखील वाढेल व त्यानुसार आवश्यक कर्ज निधी प्राप्त होउ शकेल. सदर बाब विचारात घेता "पाणी पुरवठा लाभ कर" लावणे आवश्यक आहे.

पाणी पुरवठा विभागाचे सन २०२१-२२ वर्षाची महसुली जमा रु.८७१६ लक्ष इतकी आहे व महसुली खर्च रु.१०६४० लक्ष असून तफावत रु. १९२४ लक्ष इतकी आहे.

पाणी पुरवठयाच्या सुविधा पुरविण्यासाठी आणि त्यात सुधारणा करण्यासाठी भांडवली कामांवर केलेल्या किंवा करावयाचा संपुर्ण खर्च किंवा त्याचा काही भाग भागविण्यासाठी महानगरपालिकेला आवश्यक वाटेल एवढया त्या कामांच्या कर योग्य मुल्यांच्या टक्केवारीने आकारावयाची "पाणी पुरवठा लाभ कर" या नावाने ओळखली जाणारी अतिरीक्त पाणीपट्टी महाराष्ट्र प्रांतिक अधिनियमचे कलम १२९ (१) (अअ) नुसार आकरणे शक्य आहे व हा कर लागू करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे. तरी उक्त तरतुदीनुसार ८ टक्के पाणीपुरवठा कर लागु केल्यास या कराच्या रुपाने महानगरपालिकेस वाढीव उत्पन्न मिळू शकेल. या करिता यापुर्वी मा.स्थायी समिती ठराव क्र. ११८ दि.११/०३/२०१० व मा.महासभा दि.३१/०३/२०१० ठराव क्र. ६८ अन्वये पाणी पुरवठा लाभ कर लागु करण्यात आलेला होता. सदर ठराव नगरविकास विभाग यांनी शासन निर्णय क्र.मिभाम-१११०/५३८/प्र.क्र. ९३/२०१०/नवि-२८ दि.१८/०१/२०११ अन्वये विखंडीत करण्यात आला आहे.

दि.२७/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सह.आयुक्त नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी सदर उत्पन्न स्तोत्रा मध्ये वाढ करणे आवश्यक आहे. १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार मालमत्ता कराच्या उत्पन्नात वाढ करणे बाबत सुचवण्यात आले आहे. पंधरावा वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी विविध अटी व शर्ती निर्धारित केल्या आहेत. यामध्ये उत्पनात वाढ करणे ही प्रमुख शिफारस आणि अट निर्धारीत करण्यात आली आहे.

राज्यातील इतर महानगरपालिका जसे ठाणे महानगरपालिकेत करयोग्य मुल्याच्या निवासी वापराकरीता १७% व अनिवासी वापराकरीता २२% तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत निवासी व अनिवासी वापराकरीता १२.५०% "पाणी पुरवठा लाभ कर" आकारण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १२९(१)(अअ) नुसार "पाणी पुरवठा लाभ कर" लावण्याची तरतुद असुन तरतुदीनुसार "पाणी पुरवठा लाभ कर" लागू करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे. राज्यातील इतर महानगरपालिकांनी देखिल सदर कर लागु केलेला आहे. उक्त तरतुदीनुसार निवासी वापराकरीता १०% व अनिवासी वापराकरीता १५% पाणी पुरवठा लाभ कर लागु केल्यास या कराच्या रुपाने महानगरपालिकेस वाढीव उत्पन्न मिळू शकेल व येणाऱ्या उत्पन्नातुन पाणी पुरवठा योजना सारखे प्रकल्प मार्गी लावणे शक्य होईल. करीता वरीलप्रमाणे करयोग्य मुल्याच्या (Ratable Value) निवासी वापराकरीता १०% व अनिवासी वापराकरीता १५% "पाणी पुरवठा लाभ कर" लागू करणे आवश्यक आहे.

सदर "पाणी पुरवठा लाभ कर" लागू करणेस प्रशासकिय ठरावाव्दारे मान्यता देण्याच्या प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ३३४ दि. २८/०३/२०२३**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) च्या (१अ) व (१ब) नुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ २०२०/प्र.क्र.७१(भाग-२) नवि-१४ दि. २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी श्री. दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १२९(१)(अअ) नुसार "पाणी पुरवठा लाभ कर" लावण्याची तरतुद असुन निवासी वापराकरीता १०% व अनिवासी वापराकरीता १५% पाणी पुरवठा लाभ कर लागु केल्यास या कराच्या रुपाने महानगरपालिकेस वाढीव उत्पन्न मिळू शकेल व येणाऱ्या उत्पन्नातुन पाणी पुरवठा योजना सारखे प्रकल्प मार्गी लावणे शक्य होईल. करीता वरीलप्रमाणे करयोग्य मुल्याच्या (Ratable Value) निवासी वापराकरीता १०% व अनिवासी वापराकरीता १५% "पाणी पुरवठा लाभ कर" लागू करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

वरील "पाणी पुरवठा लाभ कर" लागू करण्याच्या पारित ठरावानुसार पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाने नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

दि २८/03/२०२३

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक** (३३८) अग्निशमन सेवा कर फी मध्ये वाढ करणेबाबत.

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणांस सविनय कळवितो की, अग्निशमन विभाग ही अत्यावश्यक सेवा असुन शहरातील नागरिकांच्या जीवीताचे व मालमत्तेचे रक्षण करण्याकरिता कायम अद्ययावत व सुसज्ज असणे आवश्यक आहे. सध्यस्थितीत शहराच्या लोकसंखेने १० लाखाचा टप्पा पार केलेला आहे. त्यामुळे शहराची अग्निशमन सेवा सक्षम करणे ही एक आवश्यक बाब आहे.

सद्यस्थितीत मिरा भाईंदर महारनगरपालिका क्षेत्रात अग्निशमन व आपतकालीन सेवा पुरविणेकरिता एकुण ६ अग्निशमन स्थानके कार्यरत असुन नविन अग्निशमन स्थानके बांधणे देखिल प्रस्तावीत आहेत. अग्निशमन विभागाकडिल कार्यरत ६ अग्निशमन स्थानके व त्यातील उपलब्ध कर्मचारी वर्ग आणी वाहने यांचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| प्र मुख्य अग्निशमन अधिकारी | - ०१ |
| अग्निशमन केंद्र अधिकारी | - ०३ |
| सब स्टेशन ऑफिसर | - ०५ |
| लिडींग फायरमन | - २९ |
| यंत्रचालक | - १० |
| वाहनचालक | - ०३ |
| फायरमन | - २१ |
| सफाई कामगार | - ०५ |
| मजूर | - ०४ |
| ठेका वाहनचालक | - ९६ |
| ठेका मजुर | - १५० |
| एकूण | - ३२७ |

**अग्निशमन दलात उपलब्ध एकूण वाहने**

| | |
|---|---|
| १) रेस्क्यू | - ०१ |
| २) वॉटर मिस्ट कम रेस्क्यु वेहिकल | - ०१ |
| ३) पिकअप | - ०६ |
| ४) बोलेरो जीप | - ०३ |
| ५) मिनी वॉटर टेंडर | - ०६ |
| ६) ॲम्ब्युलन्स | - ०१ |
| ७) वॉटर टेंडर | - ११ |
| ८) टी. टी. एल | - ०२ |
| ९) टँकर | - ०२ |
| १०) मल्टीपर्पज वाहन | - ०२ |
| ११) ए.एल.पी | - ०१ |
| एकूण | - ३६ |

वरिलप्रमाणे अग्निशमन विभागाकडे वाहने व मनुष्यबळ उपलब्ध आहे. तसेच शहरात झपाट्याने सुरु असलेली विकास बांधकामे लक्षात घेता भविष्यात शहराच्या लोकसंखेत देखिल झपाट्याने वाढ होणार आहे. सद्यस्थितीतील सुरु असलेली इमारत बांधकामे व त्याअनुषंगाने होणारी संभाव्य लोकसंख्या वाढ विचारात घेता विभागाने या दोन वर्षात एकुण १४ विविध अद्ययावत वाहने खरेदी केली आहेत तसेच पेणकरपाड अग्निशमन स्थानक हे नविन अग्निशमन स्थानक कार्यान्वीत केले आहे. या सोबतच भविष्यात नागरिकांना अग्निशमन व आपतकालीन सेवा पुरविणेकरिता कर्मचारी भरती देखिल करण्यात येणार आहे.

वरील बाबी विचारात घेता नवीन खरेदी केलेल्या वाहनांमुळे विभागाच्या एकुण वाहन संखेत वाढ झालेली आहे. परिणामी सदर वाहनांच्या पेट्रोल इंधन व देखभाल दुरुस्ती, नविन कर्मचारी वर्ग भरती करणे यामुळे आस्थापना खर्च व त्यांचा गणवेश व इतर साहित्य खरेदी, अग्निशमन स्थानकांची देखभाल दुरुस्ती तसेच नविन साधन सामग्री खर्च या सर्वच खर्चात वाढ होणार आहे. अग्निशमन विभागास सदरचे खर्च पार पाडणेस उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत खालीलप्रमाणे आहे.

१) अग्निशमन सेवा कर

२) कॅपीटेशन फी

वरिलपैकी अग्निशमन सेवा कर हा महापालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत वसुल करण्यात येतो. सदर कराची आकारणी ही मालमत्ता कराच्या करयोग्य मुल्यावर १% याप्रमाणे करण्यात येते. गेली किमान १५ वर्षे सदर करात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. परंतु शहराचा होत असलेला विकास व परिणामाने अग्निशमन विभागाचे होत असलेले सक्षमीकरण यामुळे अग्निशमन विभागास यापुढे वाढीव खर्च भागविणेकरिता अग्निशमन विभागाच्या महसुली उत्पन्नात वाढ करणे आवश्यक आहे.

तरी अग्निशमन विभागाचे सक्षमीकरण ही बाब विचारात घेता होणाऱ्या वाढीव खर्चाची पुर्तता करणेकामी विभागाच्या महसुली उत्पन्नात वाढ होण्याच्या उद्देशाने "अग्निशमन सेवा कर" हा मालमत्ता कराच्या करयोग्य मुल्यावर १.५% याप्रमाणे आकारणेस मान्यता मिळणे करिता मा. सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळणेस शिफारस असे.

**मा. आयुक्त सो यांचे मान्यतेने**

**(मारुती गायकवाड)**
**उप-आयुक्त**
**अग्निशमन व आणीबाणी सेवा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## सर्वसाधारण सभा
**प्रशासकीय ठराव दि.२८/०३/२०२३ रोजी स.११.०० वाजता**

**विषय :-** अग्निशमन सेवा कर फी मध्ये वाढ करणेबाबत.
३३६

**कार्यालयीन प्रस्ताव**

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणांस सविनय कळवितो की, अग्निशमन विभाग ही अत्यावश्यक सेवा असुन शहरातील नागरिकांच्या जीवीताचे व मालमत्तेचे रक्षण करण्याकरिता कायम अद्ययावत व सुसज्ज असणे आवश्यक आहे. सध्यस्थितीत शहराच्या लोकसंखेने १० लाखाचा टप्पा पार केलेला आहे. त्यामुळे शहराची अग्निशमन सेवा सक्षम करणे ही एक आवश्यक बाब आहे.

सद्यस्थितीत मिरा भाईंदर महारनगरपालिका क्षेत्रात अग्निशमन व आपतकालीन सेवा पुरविणेकरिता एकुण ६ अग्निशमन स्थानके कार्यरत असुन नविन अग्निशमन स्थानके बांधणे देखिल प्रस्तावीत आहेत. अग्निशमन विभागाकडिल कार्यरत ६ अग्निशमन स्थानके व त्यातील उपलब्ध कर्मचारी वर्ग आणी वाहने यांचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| प्र मुख्य अग्निशमन अधिकारी | - ०१ |
| अग्निशमन केंद्र अधिकारी | - ०३ |
| सब स्टेशन ऑफिसर | - ०५ |
| लिडींग फायरमन | - २९ |
| यंत्रचालक | - १० |
| वाहनचालक | - ०३ |
| फायरमन | - २१ |
| सफाई कामगार | - ०५ |
| मजूर | - ०४ |
| ठेका वाहनचालक | - ९६ |
| ठेका मजुर | - १५० |
| **एकूण** | - ३२७ |

**अग्निशमन दलात उपलब्ध एकूण वाहने**

| | |
|---|---|
| १) रेस्क्यू | - ०१ |
| २) वॉटर मिस्ट कम रेस्क्यु वेहिकल | - ०१ |
| ३) पिकअप | - ०६ |
| ४) बोलेरो जीप | - ०३ |
| ५) मिनी वॉटर टेंडर | - ०६ |
| ६) ॲम्ब्युलन्स | - ०१ |
| ७) वॉटर टेंडर | - ११ |
| ८) टी. टी. एल | - ०२ |
| ९) टँकर | - ०२ |
| १०) मल्टीपर्पज वाहन | - ०२ |
| ११) ए.एल.पी | - ०१ |
| **एकूण** | - ३६ |

वरिलप्रमाणे अग्निशमन विभागाकडे वाहने व मनुष्यबळ उपलब्ध आहे. तसेच शहरात झपाट्याने सुरु असलेली विकास बांधकामे लक्षात घेता भविष्यात शहराच्या लोकसंखेत देखिल झपाट्याने वाढ होणार आहे. सद्यस्थितीतील सुरु असलेली इमारत बांधकामे व त्याअनुषंगाने होणारी संभाव्य लोकसंख्या वाढ विचारात घेता विभागाने या दोन वर्षात एकुण १४ विविध अद्ययावत वाहने खरेदी केली आहेत तसेच पेणकरपाड अग्निशमन स्थानक हे नविन अग्निशमन स्थानक कार्यान्वीत केले आहे. या सोबतच भविष्यात नागरिकांना अग्निशमन व आपतकालीन सेवा पुरविणेकरिता कर्मचारी भरती देखिल करण्यात येणार आहे.

